## नि.दि.मु.क्र. २४०/२०२४ मधील नि.क्र.१५ वरील आदेश
## (श्रीमती लक्ष्मीबाई भाऊसोा निंबाळकर व इतर वि. निर्मला मोहन बोंद्रे व इतर)

वादीने सदरचा अर्ज हा दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये दावा दुरुस्ती करीता दाखल केला आहे.

२. वादीच्या प्रस्तुत अर्जातील कथनाप्रमाणे, वादीने दाव्यात दावा मिळकतीमधील हिश्श्याचे पृथक वाटप करुन मागितले आहे. दाव्याचे कलम २ मध्ये जी वंशवेल दिली आहे त्यामध्ये काही मजकूर बदलणे आवश्यक आहे. चंद्रकला यांना अनुक्रमे निर्मला व हेमलता अशा दोन मुली व मुलगा विजय असे वारस आहेत. पैकी हेमलता मयत असून तिला अनुक्रमे अक्षय व गौरी ही मुले आहेत. त्यामुळे हेमलता यांचे वारस रेकॉर्डवर घेणे आवश्यक असून वंशवेलीत बदल करणेस परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे.

३. दाव्यातील वंशवेलीत 'तरी द्वितीय पत्नापासून अशी अपत्ये झाली आहेत' पर्यंतचे मजकुरावर काट मारणेत यावी व त्याऐवजी 'चंद्रकला हिला निर्मला व हेमलता अशा दोन मुली होत. पैकी हेमलता मयत असून तिला अक्षय व गौरी असे वारस आहेत तसेच विजय हा मुलगा आहे' असा मजकूर घालणेत यावा व तशी दुरुस्ती करणेस परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे. सदरची दुरुस्ती ही तांत्रिक स्वरुपाची असून सदर दुरुस्तीमुळे दाव्याचे मुळ स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. करीता, सदरची दुरुस्ती करण्यास परवानगी असावी अशी विनंती केली आहे.

४. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जावर आपले म्हणणे दाखल करुन सदर दुरुस्तीबाबत ना-हरकत दर्शविली आहे.

५. वादी व प्रतिवादी वकिलांचा युक्तिवाद ऐकला. वादीने सदरचा दावा हा दावा मिळकतीमधील हिश्श्याचे पृथक वाटप करुन मिळणेकरीता दाखल केला असून सदरील दुरुस्तीबाबत प्रतिवादींनी कोणतीही हरकत घेतली नाही. सदर दुरुस्तीमुळे प्रतिवादींचे काही नुकसान होणार नाही व दाव्याचे मुळ स्वरुपात कोणताही बदल

होणार नाही. सदरची दुरुस्ती ही तांत्रिक स्वरुपाची असल्याने करणे आवश्यक व गरजेचे आहे. सदरची दावा दुरुस्ती न्यायाच्या दृष्टीने आवश्यक असल्यामुळे प्रस्तुत अर्ज मंजुर करणे योग्य व उचित होईल. या सर्व बाबी विचारात घेता, खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

**आदेश**

१. वादीचा अर्ज (नि.क्र.१५) मंजूर करणेत येतो.

२. वादीने कायदेशीर मुदतीत दुरुस्ती करावी व दुरुस्त प्रत अभिलेखावर सादर करावी.

३. वादी व प्रतिवादींनी नोंद घ्यावी व विनाविलंब पुर्तता करावी.

सही/-

फलटण (श्रीमती के.आर.पाटील.)

दि. ०२.०५.२०२५ ६वे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, फलटण